प्रकल्प उत्कर्ष

महिला व बाल विकास
WOMEN & CHILD DEVELOPMENT
Government of Maharashtra

CAPRI GLOBAL CAPITAL LTD

VIPLA FOUNDATION

# सक्षम शिक्षक - सुरक्षित शाळा

## असुरक्षित आणि हिंसाग्रस्त बालकांचा आधार व्हा
## अशा बालकांना समजून घ्या:



### असुरक्षित बालकांची लक्षणे समजून घेऊ

ते सहज माघार घेतात, आक्रमक किंवा चिंताग्रस्त असतात, त्यांचे भावनिक संकेत वेगळे जाणवतात. त्यांना संवेदनशीलपणे आणि जागरूकतेने जाणून घ्या.



### सुरक्षित वातावरण निर्माण करा

तुमची शाळा / वर्ग हे अशा बालकांना विश्वासाचे आणि आदराचे ठिकाण वाटले पाहिजे. मुक्त संवाद साधतानाच त्यांच्या गोपनीयतेला महत्त्व द्या.



### सक्रिय राहून ऐका

अशा बालकांकडे सतत बारकाईने लक्ष द्या. त्यांच्या भावना आणि अनुभवांचा आदर करा. त्यांच्या म्हणण्यावर कोणताही पूर्वग्रह न ठेवता मान्य करा, त्यांना विश्वास द्या की त्यांचे ऐकले जाईल आणि नक्कीच मदत केली जाईल.



### वर्गमैत्रीला प्रोत्साहन द्या

वर्गमित्रांमध्ये एकी आणि सहानुभूतीला प्रोत्साहन द्या. त्यांच्यात प्रेम, सभ्यता आणि समजूतदारपणाची संस्कृती रुजवा.



### धीर द्या, धैर्य शिकवा

बालकांना मोकळेपणाने बोलण्यासाठी प्रोत्साहन द्या तसेच परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी अभिनव उपक्रमांची ओळख करून द्या.



### त्यांची बाजू घ्या

आवश्यक असेल तेव्हा त्यांना साथ द्या. वर्गात आणि वर्गाबाहेरही त्यांच्या शैक्षणिक आणि भावनिक गरजा पूर्ण होत असल्याची खात्री करा.



### सहाय्यक सेवांची मदत घ्या

शालेय समुपदेशक, मानसशास्त्रज्ञ यांची मदत घ्या, सामाजिक कार्यकर्ते यांचा हिरीरीने सहभाग घ्या, जेणेकरून बालकांना सर्व समावेशक पाठिंबा आणि साधने उपलब्ध करून देता येतील.

## प्रत्येक मुलाला सुरक्षित आणि आश्वासक वाटेल असे पोषक वातावरण आपण एकत्रितपणे नक्कीच तयार करू शकतो.

**संकटात असलेल्या बालकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन - 1098**

अधिक माहितीसाठी संपर्क : विपला फौंडेशन 022 -26520601
www.viplafoundation.org